महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३०५ वा | दिनांक : ०४/१०/२०२५ | वार : शनिवार

## सत्याचा लढा हरले, ढसा ढसा रडावेसे वाटतेय : अंजली दमानिया



**मुंबई :** एक सत्याचा लढा आज हरले. नितीन गडकरी आणि अतुल शिरोडकर जिंकले. फक्त ढसा ढसा रडावेसे वाटत आहे, असे ट्विट सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केले आहे. आज झालेल्या उच्च न्यायालयाच्या सुनावणीत अंजली दमानिया यांना अंतरिम दिलासा मिळाला नसल्याने त्यांनी या भावना सोशल मीडियावर व्यक्त केल्या आहेत.

अंजली दमानिया म्हणाल्या, आज हाय कोर्टात सुनावणी झाली. कोर्टाने अंतरिम दिलासा दिला नाही. म्हणजे आज या सगळ्या लोकांची घरे, जी त्यांनी कष्टाच्या पैशांनी विकत घेतली होती, ती एक असा माणूस तोडणार जो फक्त गडकारींचा बिझनेस पार्टनर आहे, म्हणून जिंकला. खरेच या लढ्याला उपयोग आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच फक्त ढसा ढसा राडावेसे वाटत असल्याचे देखील त्यांनी भावना व्यक्त केल्या. पुढे त्यांनी लिहिले की, गडकरी तुमच्या कर्माची फळे तुम्हाला याच जन्मात भोगावी लागतील, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे.

हे नेमके प्रकरण काय आहे, याची माहिती अंजली दमानिया यांनी १ ऑक्टोबर रोजी केलेल्या ट्विटमध्ये आपल्याला मिळते. यात त्यांनी या प्रकरणाची सविस्तर माहिती समजाऊन सांगितली आहे. प्रकरण थोडक्यात असे आहे की केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा व्यावसायिक मित्र अतुल शिरोडकर यांना भांडुपमधली जमीन केवळ ८९ लाखात गडकारींनी मिळवून दिली असल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला आहे.

अंजली दमानिया यांनी केलेल्या ट्विट नुसार, नितीन गडकरी यांचा व्यावसायिक मित्र असलेला अतुल शिरोडकर यांना सगळेच्या सगळे कायदे धाब्यावर बसवून एसीएस वळसा नायर आणि एसीएस असीम गुप्ता यांना गडकारींनी थेट फोन करून, मित्राला ४ एकर भांडुपमधली जमीन केवळ ८९ लाखात मिळवून दिली. या दोन्ही अधिकाऱ्यांना पूर्ण कल्पना आहे की आपण जे करतोय ते चुकीचे आहे, पण त्यांच्यात कायद्याने काम करायची हिंमत नाही. ८९ लाखात भांडुपमध्ये आता २बीएचके चे घर येत नाही. पण गडकरींच्या मित्राला हजार कोटींचा प्रोजेक्ट मिळाला, अशी माहिती त्यांनी दिली.

पुढे अंजली दमानिया एसआरए हा राजकारण्यांचा अड्डा कसा झाला आहे यावर माहिती देताना लिहितात, साईनगर भांडुप ही ६६० घरांची वस्ती. अतिशय स्वच्छ चाळी. १९९१-९२ मध्ये या २०० ते २५० फुटाची घरे एका जमीन मालकाने बांधली आणि घर व त्या खालची जमीन ही ६६० कुटुंबांना विकली. तुम्ही सोसायटी झाली की मी कन्वेयन्स करेन असे मालकाने सांगितले. सुखाने ही माणसे राहत होती.

२००७ मध्ये याच मालकाने हीच जमीन अतुल शिरोडकर या इसमाला २ कोटी रुपयाला विकली. २ कोटी पैकी फक्त ८९ लाख त्या शिरोडकरने दिले. पण पैसे मिळतीलच असे समजून त्या मालकाने कन्व्हेयन्स शिरोडकरच्या नावाने केले. २००९ मधे या लोकांना कळले तेव्हा त्यांनी कोर्टात धाव घेतली. पण गडकरी या शिरोडकरचे मित्र, त्यात आमदार सुनील राऊत मित्र मग काय विचारा. सर्व्हेला ६६० पैकी ३०० घरे बंद दाखवली, खोटी कॉनसेंट दाखवली, खोटे कागदपत्र केले. अनेक्शर I, अनेक्शर II आणि अनेक्शर III, तिन्ही बनावट. ना प्लॅन धड, ना शिरोडकरांची आर्थिक स्थिती धड.

सुनावणी घेणारे एजीआरसी खरेतर ५ लोकांचे असते. न्याय व्हावा म्हणून. आमच्या केस मध्ये ५ पैकी ३ जण नव्हते, असीम गुप्तांनी आमच्या विरोधात निर्णय दिला, पण अश्विनी जोशी यांनी डिसेंट ऑर्डर दिली. पण तरीही ४ जणांचा निर्णय एकतर्फी आहे असे खोटे दाखवून ३३/३८ ची नोटीस काढली.

अंजली दमानिया यांनी या लढ्यात कधी उडी घेतली, याविषयी माहिती देताना अंजली दमानिया लिहितात, एप्रिल २०२४ पासून मी या लढ्याला सुरुवात केली. यांना न्याय मिळावा म्हणून माझा स्वाभिमान बाजूला ठेऊन, याच वर्षी एप्रिलमध्ये मी दिल्लीला जाऊन गडकारींची भेट घेतली. तेव्हा योगायोगाने संजय दिना पाटील पण भेटले, ते देखील माझ्यासोबत आले. पण काहीही झाले नाही.

पुढे अंजली दमानिया यांनी माहिती दिली की, मुंबईतील सुनील राऊत यांच्याशी दोन वेळा बोलले, संजय राऊत यांच्या सामनाच्या ऑफिसमध्ये जाऊन भेट घेतली. सगळ्यांकडे न्यायची भीक मागितली. पण काहीही झाले नाही. १०० वेळा फडणवीस यांना विनंती केली. एकनाथ शिंदेंना भेटले. तेही वळसा नायर यांच्याशी बोलले. आशिष शेलार यांना भेटलो, त्यांनी असीम गुप्ता यांना फोन केला. तसेच एजीआरसीमध्ये स्वतः हजर होऊन जीव तोडून कढले, पण ११ सप्टेंबरला गडकरी जिंकले. सगळे राजकारणी जिंकले आणि सामान्य माणूस हरला. इथे राहणारी माणसे अतिक्रमण करून घुसखोरी करणारी नव्हती, ही घरे त्यांची स्वतःची होती. त्यांनी एसआरए च्या काडीपेट्यांच्या घरात का राहावे? असा सवाल अंजली दमानिया यांनी केला होता.

## नालायकांच्या हाती नवी मुंबईची सत्ता नको : गणेश नाईक

**मुंबई :** महाराष्ट्रात सध्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकारण पेटले आहे. त्यात ठाण्यातील राजकीय संघर्ष चांगलाच रंगात आला असल्याचे दिसत आहे. वन मंत्री गणेश नाईक आणि शिवसेना शिंदे गटातील नेत्यांमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याचे दिसून येत आहे. एका कार्यक्रमात बोलताना गणेश नाईक यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांच्यावर नाव न घेता खोचक टीका केली आहे. त्यावर शिंदे गटाचे नेते व उद्योग मंत्री उदय सामंत यांनी देखील पलटवार केला आहे.

एका कार्यक्रमात बोलताना मंत्री गणेश नाईक म्हणाले की, तुम्ही भविष्याचा विचार करणार की नाही. नवीन एफएसआय लागू झाला तर या शहराची वाट लागेल. आज नवीन मुंबईत काही ठिकाणीच पाणी साचते, तुंबापूरी होत नाही. कारण आपण या शहरांच्या नाल्याची रचना तशी केली आहे. पण जर नालायक लोकांच्या हातात नवी मुंबई महानगरपालिका सत्ता गेली तर या शहराचा वाटोळे झाले म्हणायचे. आपण जबाबदारीने हे विधान करत असल्याचेही नाईक यांनी स्पष्ट केले.

पुढे बोलताना गणेश नाईक यांनी शिंदेंना टोला लगावताना म्हणाले, आपल्या मनात कोणाविषयी द्वेष नाही. गणेश नाईक सुखी आहे. जो पैसा माझी झोप उडवेल तो पैसा मला नको आहे. आयटीचे लोक येतील, लुटारू येतील, सीबीआय येईल. सुखाची झोप मिळते, मग असा पैसा काय कामाचा, माझा हात साफ आहे आणि मन पण साफ आहे, असा टोला गणेश नाईक यांनी शिंदेंना लगावला होता. यावर मंत्री उदय सामंत यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

मंत्री उदय सामंत यांनी गणेश नाईक यांच्या टीकेला उत्तर देताना म्हणाले, नालायकांच्या हाती सत्ता देऊ नये, म्हणजेच त्याच्या हाती सत्ता दिली जाणार नाही. समन्वय समितीत ही संवाद साधण्यासाठी आहे. ऊठसूट एकनाथ शिंदेंवर टीका खपवून घेणार नाही, नाईकांना काही अडचणी असतील तर त्यांनी एकनाथ शिंदे यांची वेळ घ्यावी. ज्याची ज्या पद्धतीने कुवत असते त्याला ते पद मिळते. आमच्या खासदारांनाही बोलता येत नाही का? पण साहेब सांगतात की मित्र पक्षावर बोलू नका म्हणून सर्व शांत आहेत.

## चार नवीन 'सहायक आयुक्तां'ची तातडीने पदस्थापना



**मुंबई :** महापालिकेसह राज्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार ३१ जानेवारी २०२६ पूर्वी पूर्ण करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या निवडणुका घेण्यासाठी प्रशासन आणि राज्य निवडणूक आयोगाकडून जोरदार पूर्वतयारी करण्यात येत आहे.

या निवडणुकीच्या पूर्वतयारी दरम्यानच, बृहन्मुंबई महानगरपालिकेने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने परीक्षेअंती शिफारस केलेल्या सहायक आयुक्त संवर्गातील चार अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेचे आदेश आज, ३ ऑक्टोबर २०२५ रोजी जारी करण्यात आले आहेत. महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या आदेशानुसार ही रिक्त पदे तातडीने भरण्यात आली आहेत.

नवनियुक्त चार सहायक आयुक्त

अ) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवडीने सहायक आयुक्त संवर्गात पदस्थापना विषयक चार आदेश पुढीलप्रमाणे

१) संतोष गोरख साळुंखे - सहायक आयुक्त, सी विभाग २) वृषाली पांडुरंग इंगुले - सहायक आयुक्त, एफ दक्षिण विभाग ३) योगेश रंजीतराव देसाई - सहायक आयुक्त, बी विभाग ४) आरती भगवान गोळेकर - सहायक आयुक्त, आर दक्षिण विभाग

ब) सहायक आयुक्त संवर्गात बदलीविषयक आदेश पुढीलप्रमाणे

१) नितीन शुक्ला, सहायक आयुक्त (बी विभाग) तसेच सहायक आयुक्त के पूर्व (अतिरिक्त कार्यभार) - सहायक आयुक्त (के पूर्व विभाग) २) संजय इंगळे, सहायक आयुक्त (सी विभाग) - नगर अभियंता विभागाकडे प्रत्यावर्तीत ३) महेश पाटील, सहायक आयुक्त, एफ दक्षिण विभाग - सहायक आयुक्त, एस विभाग ४) अलका ससाणे, सहायक आयुक्त, एस विभाग - सहायक आयुक्त, बाजार विभाग ५) मनीष साळवे, सहायक आयुक्त, आर दक्षिण विभाग - नगर अभियंता विभागाकडे प्रत्यावर्तीत

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सहायक आयुक्त संवर्गात एकूण १४ उमेदवारांची शिफारस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून करण्यात आली होती. यापैकी, सहा उमेदवारांची सहायक आयुक्त पदावर यापूर्वीच पदस्थापना करण्यात आली होती, तर आज (३ ऑक्टोबर २०२५) आणखी चार सहायक आयुक्तांना पदस्थापना देण्यात आली आहे.

उर्वरित चार उमेदवारांपैकी एका उमेदवाराला त्यांच्या पूर्वीच्या कार्यसंस्थेकडून अद्याप कार्यमुक्त करण्यात आलेले नाही, तर एक उमेदवार सध्या प्रसूती रजेवर आहेत. याव्यतिरिक्त, उर्वरित दोन उमेदवार सद्यस्थितीत विभाग संलग्नता प्रशिक्षण घेत आहेत. हे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांची सहायक आयुक्त पदावर पदस्थापना करण्यात येणार आहे.

दरम्यान, सहायक आयुक्तसारखे महत्त्वाचे पद दीर्घकाळ रिक्त ठेवणे प्रशासकीय दृष्ट्या योग्य नसल्यामुळे, सद्यस्थितीत रिक्त असलेल्या सहायक आयुक्त पदांचा कार्यभार प्रशासकीय निकड आणि निर्णयानुसार उपप्रमुख अभियंता किंवा कार्यकारी अभियंता संवर्गातील अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ ऑक्टोबर २०२५


## मुक्त विद्यापीठाच्या विभागीय संचालकपदी डॉ. नंदकुमार राठी यांची नियुक्ती



**छत्रपती संभाजीनगर :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय केंद्राच्या विभागीय संचालक (वरिष्ठ सल्लागार) पदी डॉ. नंदकुमार सत्यनारायण राठी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी ०१ ऑक्टोबर २०२५ रोजी आपला कार्यभार स्वीकारला.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या मार्गदर्शनानुसार प्रभारी कुलसचिव व वित्त अधिकारी गोविंद कतलाकुटे यांनी डॉ. राठी यांना नियुक्तीचे पत्र दिले. डॉ. नंदकुमार राठी हे यापूर्वी गांधी महाविद्यालय कडा येथे प्राचार्य म्हणून कार्यरत होते. डॉ. राठी यांनी जेईएस महाविद्यालय, जालना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात जवळपास ४० वर्षे अध्यापनाचे कार्य केले आहे. त्यांची १३ पुस्तके प्रकाशित असून एका पुस्तकाचे संपादनही त्यांनी केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात कार्यरत असतांना डॉ. नंदकुमार राठी यांनी अभ्यास मंडळाचे सदस्य, वित्त व लेखाधिकारी, परिक्षा नियंत्रक, कुलसचिव आणि व्यवस्थापन परिषद सदस्य अशी महत्त्वाची पदे भूषविली आहेत. त्यांची ७० हून अधिक संशोधनपर लेख प्रकाशित असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली १७ विद्यार्थ्यांनी एम.फिल. आणि १८ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी मिळविली आहे.

डॉ. नंदकुमार राठी यांच्या नियुक्तीमुळे विविध अभ्यास केंद्राचे प्रमुख आणि केंद्र संयोजकांनी अभिनंदन करून एक चांगला अभ्यासू संचालक मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

## गांधीविचार हे तत्त्वज्ञान नसून आचरणाचा विषय : डॉ.राजेंद्र निगडे



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** महात्मा गांधी यांच्याविषयी भारतीय जनमानसात अनेक गैरसमज असून जागतिक पातळीवर जो न्याय महात्मा गांधी यांना मिळाला,तो आपण त्यांना त्यांच्या हयातीत देऊ शकलो नाही हे वास्तव आहे.महात्मा गांधी हे केवळ व्यक्ती नसून ते एक विचार आहे.तत्कालीन परिस्थितीत त्यांना जे योग्य आणि यथोचित वाटले त्यापद्धतीने त्यांनी राजकीय व सामाजिक निर्णय घेतले आणि आपल्या आंदोलनाची दिशा निश्चित केली.असहकार आणि अहिंसेच्या तत्वांवर त्यांनी आपल्या आंदोलनाची पायाभरणी केली.गरिबी निर्मूलन,आर्थिक स्वावलंबन,स्त्रियांचे समान हक्क,सर्वधर्मसमभाव, अस्पृश्यता निवारण,आणि सर्वात महत्वाचे म्हणजे स्वातंत्र्य यासाठी देशभरात तीव्र चळवळ उभी केली.महात्मा गांधींनी आत्मशुद्धीसाठी आणि राजकीय चळवळीसाठी साधन म्हणून प्रदीर्घ उपवास केले,महात्मा गांधी हे नेहमीच संप्रदायिकतेचे विरोधक होते.त्यामुळे साहजिकच ते सर्व जाती ,धर्म आणि पंथ यांच्यातील शेवटच्या माणसापर्यंत पोहचले.

ढासळत जाणाऱ्या खिलाफत चळवळीला त्यांनी आधार दिला. इंग्रजांनी लादलेल्या मिठावरील करा विरोधात त्यांनी हजारो भारतीयांचे दांडी यात्रेमध्ये प्रतिनिधित्व केले.महात्मा गांधी हे तत्त्वज्ञानी नव्हते.ते शास्त्रशुध्द विचारवंतही नव्हते,पण वास्तववादी होते, आचरणवादी होते.गांधीविचार हा जगण्याचा विचार होता.त्याचे विचार किंवा गांधीविचार हा तत्त्वज्ञानाचा विषय नसून तो आचरणाचा विषय आहे.तालुक्यातील गुंजोटी येथे आयोजित महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात उपस्थित डॉ.राजेंद्र निगडे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड हे होते.श्रीकृष्ण वरिष्ठ महाविद्यालयात स्वातंत्र्याचे प्रणेते महात्मा गांधी आणि पूर्वप्रधानमंत्री लालबहादुर शास्त्री यांची जयंती स्वच्छता हीच सेवा या प्राधान्यक्रमाने मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला अनुक्रमे महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेला मराठी विभागप्रमुख आणि प्रमुख पाहुण्या डॉ. आसिया चिश्ती यांच्या हस्ते पुष्पहार घालून अनुक्रमे महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेचे प्रतिमापूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सविस्तर प्रास्ताविक झाल्यानंतर प्रमुख पाहुण्या डॉ.आसिया चिश्ती म्हणाल्या की, महात्मा गांधी हे सर्वंकष समाज एका समान पातळीवर आणावा या मताचे होते.कोणतीही महान विभूती ही कालखंडावर आपला प्रभाव सोडून जात असते.त्यापैकीच महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री या महान विभूती होत्या.

त्यांच्या जयंतीनिमित्ताने आपण सर्वांनी त्यांच्या विचारांचे स्मरण केले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.महात्मा गांधी हे मानवतावादाचे उपासक असून अहिंसा या उदात्त संकल्पनेचे पुरस्कर्ते होते. महात्मा गांधी यांनी सृष्टीजीवनबरोबर समाजाच्या समानतेचा विचारही महत्वाचा मानला. लालबहादुर शास्त्री यांनीही गांधीचा विचारच पुढे नेण्याचा प्रयत्न केला.त्यांच्या वैचारिक दर्शनानुसार जनतेच्या अंतिम टोकापर्यंत सेवा पोहोचविणे ही खरी सेवा आहे.यावेळी प्रवर्तन मंचावर डॉ.रमेश मादळे,डॉ.रमेश पात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचन डॉ.भाऊसाहेब उगले यांनी केले अध्यक्षीय समारोपानंतर कार्यक्रमाचे आभार सांस्कृतिक विभागाचे प्रा.एन.जे.पवार यांनी व्यक्त केले त्यानंतर लागलीच राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.त्यात सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

स्वच्छता हीच सेवा या मध्यवर्ती संकल्पनेला अनुसरून समाजोपयोगी कार्यानुसार स्वच्छता मोहीम म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाचा भाग म्हणून स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले त्यात महाविद्यालयातील प्रा. डॉ. किसन लोहार, डॉ. दस्तगीर पठाण, डॉ. बालाजी कोनाळे, प्रा. डॉ. योगीराज विजापुरे, प्रा. डॉ. रामकृष्ण कदम, डॉ. महादेव खोत, डॉ. मेघा जोशी, डॉ. उमाकांत सूर्यवंशी, डॉ.प्रा.रामदास कोळी,डॉ.सुनील पतंगे ,डॉ. अनिलबापू काळदाते,डॉ.दिगंबर चव्हाण,डॉ. पी.एस .राऊत,डॉ. विलास होगाडे,डॉ.विनोद धनेराव,प्रा.अरविंद राठोड,प्रा.शंकर चव्हाण,प्रा.आय. एस.इनामदार,प्रा.कोडे,प्रा.गायकवाड आदी शिक्षक,कार्यालयातील सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपला उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.चहा पानानंतर कार्यक्रमाची अधिकृत सांगता झाली.

## उद्धव ठाकरेंनी बाळासाहेबांच्या बॉडीचा दोन दिवस छळ केला : रामदास कदम

**मुंबई :** उद्धव ठाकरे यांनी आपले वडील तथा दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या मृतदेहाचा सलग २ दिवस छळ केल्याचा गंभीर आरोप उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी केला आहे. उद्धव ठाकरे दिसतात तसे नाहीत. ते कपटी आहेत. त्यांनी शिवसेनाप्रमुखांच्या बॉडीचा सलग २ दिवस छळ केला. मी खोटे बोलत असेल तर माझी व उद्धव ठाकरे यांची नार्को टेस्ट करा. होऊन जाऊ द्या दूध का दूध आणि पाणी का पाणी, असे ते म्हणालेत. रामदास कदम यांच्या या आरोपांमुळे दोन्ही शिवसेनेतील राजकारण चांगलेच तापले आहे.

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा काल दसरा मेळावा झाला. या मेळाव्यात भाषण करताना रामदास कदम यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर बाळासाहेबांच्या मृतदेहाचा छळ केल्याचा आरोप केला होता. या मुद्यावरून शिंदे व ठाकरे गटाच्या नेत्यांत आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. या पार्श्वभूमीवर कदम यांनी आज पुन्हा पत्रकारांशी संवाद साधताना आपण आपल्या विधानावर ठाम असल्याचे ठणकावून सांगितले.

रामदास कदम म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेबांच्या बॉडीचा सलग २ दिवस छळ केला. माझ्यासारखा ५० वर्षे मातोश्रीत वाढलेला माणूस असे का बोलते याचे उद्धव यांनी आत्मपरीक्षण करावे. हिंमत असेल तर त्यांनी स्वतः पुढे येऊन बोलावे. मी अंबादास दानवेंसारख्यांना उत्तर देणार नाही. या दानवेंना मी स्वतः निवडून आणले. माझ्यामुळे ते आमदार झाले. ते एहसान फरामोश आहेत. ते मला बाळासाहेब व शिवसेना काय शिकवणार? बाळासाहेब ठाकरे माझे दैवत आहेत. मी आजही पूजेला बसताना त्यांच्या फोटोपुढे डोके टेकवतो. पण रामदास कदम सारख्या ज्येष्ठ नेत्याला हे का बोलावे लागते?


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ ऑक्टोबर २०२५

# दसरा

सण दसऱ्याचा आला
आनंदला उधळण फार
अंगणी सडा रांगोळी सारवण
झेंडू फुलांनी सजले द्वार

सिम्मोलंगण करूनी
करिती आपट्याची पूजा
असत्यावर सत्याचा विजय
करूया अंधकार जिवनातून वजा

मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम
सांगून गेले जीवनाचे सूत्र
नितीने करू अनीतिचा नाश
सदैव हृदयात जपून माणुसकीचे गोत्र

आपट्याची पाने त्याला हृदयाचा आकार
प्रत्येकाच्या दु:खावर घालू मानवतेचे फुंकर
श्री रामाने केला अत्याचारी रावणाचा संहार
करावा लागेल आता ही माणुसकीच्या दुश्मनांवर वार

झेंडूच्या फुलांची दसऱ्याला उधळण
तशी माणुसकीच्या जीवनात काट्याची पेरण
काटेरी जगात पेरू माणुसकीचे फुलं
उधळूनी समतेचे रंग , फुलवू मानवतेचे रान

तोडूनी द्वेष अन् मत्सर दसऱ्याच्या दिनी
प्रभू रामाची शिकवण, जगु आनंदानी
सोन्यासारखा नरदेह लाभला जीवनी
करू सन्मान सर्वांचा जगू आनंदाने

**संदिप वाकडे पाटील**
**रा खेडा ता.कन्नड**

## राज्यस्तरीय एस. आर. डी. पथसंचालनाकरता शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची निवड





**कन्नड :** राष्ट्रीय प्रजासत्ताक पथसंचलन २०२५-२६ या वर्षा करिता राष्ट्रीय एन आर डी, राज्यस्तरीय एस आर डी पथसंचालनाकरता शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक कमलेश कदम, दिपाली गायकवाड, निकिता जाधव यांनी दिनांक २६ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ ,नागपूर येथे निवड चाचणी स्पर्धेत यशस्वी सहभाग घेतला यावेळी त्यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य भाऊसाहेब मगर कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रकाश महाजन, डॉ. राकेश अहिरराव, डॉ .सीमा काशीद.

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

## इकरा पब्लिक शाळेत महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी











**जळगाव :** सत्य, अहिंसा व शांतीचा निर्मळ झरा म्हणजे महात्मा गांधीडॉ. अ.करीम, सालार इकरा नगर मोहाडी जळगाव 2/10/2025 इकरा शिक्षण संस्था संचलित इकरा पब्लिक शाळेमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमात नि:स्पृह शास्त्रीजी यांच्याबद्दल माहिती जिया गुलाम दस्तगीर यांनी सादर केली.महात्मा गांधीजींची माहिती दानिश अहमद व शफीक अंसारी यांनी आपल्या दर्जेदार भाषणातून सांगितली.

तसेच "मोठ्या मनाचा छोटा माणूस ही गोष्ट "आरीफ खान यांनी सांगितली.दांडी यात्रेचा प्रसंग वर्ग 7च्या विद्यार्थ्यांनी सादर केला. "दे दी हमे आजादी" हे गीत वर्ग 6 च्या विद्यार्थ्यांनी सादर केले.

कार्यक्रमाचे संचलन आरीफ खान यांनी केले तर प्रास्ताविक मोहसिन खान व साजीद खान यांनी केले.यावेळी सर्वांना 'स्वच्छता ही सेवा' निमित्त सामुहिक शपथ देण्यात आली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचार्‍यांनी प्रयत्न केले.

## स भु विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने शस्त्र पूजन सोहळा उत्साहात संपन्न



**छ. संभाजीनगर (प्रतिनिधी) :** विजयादशमी (दसरा) हा भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वपूर्ण सण असून, या दिवशी शस्त्रांचे पूजन करून ज्ञान, पराक्रम व परिश्रम यांचा सन्मान केला जातो. या पार्श्वभूमीवर, श्री सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालय छ. संभाजीनगर राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने विजयादशमीच्या पूर्वसंध्येला दि 1 ऑक्टोबर 2025 रोजी शस्त्र पूजनाचा उत्सव संपन्न झाला.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. विवेक मिरगणे, स भू विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अनिल शंकरवार,डॉ शमा खोब्रागडे, प्रा संजय गायकवाड, लेफ्टनंट डॉ गजानन सानप यांची प्रमुख उपस्थिती होती.

राष्ट्रीय छात्र सेनेतील 0.22 व एस एल आर डमी रायफल तसेच गार्ड ऑफ ऑनर च्या मानाच्या तलवारीचे पूजन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.प्राचार्य डॉ विवेक मिरगणे यांनी आपल्या भाषणात शस्त्र पूजनाचे महत्त्व विशद केले विद्यार्थ्यांना विजयादशमी निमित्ताने शुभेच्छा व्यक्त केल्या.

यावेळेस राष्ट्रीय छात्र सेनेचे सर्व छात्र सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ ऑक्टोबर २०२५


## अतिवृष्टीमुळे घर कोसळले, शरण फाऊंडेशनने औदार्य दाखवले : घर पडलेल्या कुटुंबाला आर्थिक मदतीचा हात





**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** लोहारा तालुक्यातील अचलेर येथील भिमाशंकर माळगे व हिप्परगा (रवा) येथील सततच्या पावसामुळे रियाज मुलाणी यांचे घर कोसळून संसार उघड्यावर आला. या दोन्ही कुटुंबाला संकटाच्या काळात शरण पाटील फाऊंडेशनने सामाजिक औदार्य दाखवत भाजपाचे युवा नेते शरण बसवराज पाटील यांच्या हस्ते प्रत्येकी २१ हजार रुपयाची मदत देण्यात आली.

मागील २० दिवसांपासून उमरगा व लोहारा तालुक्यात पावसाने आहाकार माजवला आहे. अनेकांची खरीपाची पिके वाहुन गेली आहेत तर उर्वरित उभ्या पिकांना क-या येत आहेत. विविध गावातील नदी व ओढयाकाठच्या शेतात पाणी शिरल्याने पिकांसह माती वाहून गेली आहे.

अनेकांची घरे पडून संसाराचा चिखल झाला आहे तर कांही गुरे ढोरे ही वाहुन गेली आहेत. अस्मानी संकटामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यांना धीर देण्यासाठी उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण बसवराज पाटील व तहसीलदार रणजितसिंह कोळेकर यांनी तालुक्यातील अचलेर, आष्टा कासार, जेवळी, तावशीगड, सास्तुर, हिप्परगा रवा येथे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी अचलेर येथील भिमाशंकर माळगे व हिप्परगा (रवा) येथील सततच्या पावसामुळे रियाज मुलाणी यांचे घर कोसळून संसार उघड्यावर आला. या दोन्ही कुटुंबाला भेटल्यानंतर शरण पाटील फाऊंडेशनने सामाजिक औदार्य दाखवत फाउंडेशनच्या वतीने भाजपाचे युवा नेते शरण बसवराज पाटील यांनी प्रत्येकी २१ हजार रुपयाची मदत दिली.

यावेळी तहसीलदार रणजितसिंह कोळेकर, गटविकास अधिकारी जगदेव व्हग्गे, लोहारा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रशांत काळे, मुरुम बाजार समितीचे उपसभापती बसवराज कारभारी, भाजपाचे तालुकाध्यक्ष राजेंद्र पाटील, पंचसे माजी सभापती सिद्रामप्पा दुलंगे, बुद्धिवंत साखरे, दीपक मुळे, योगेश राठोड, हरी लोखंडे, दत्तात्रय गाडेकर, आष्टा कासारचे सरपंच सुलभा कांबळे, दिपक पाटील, रब्बानी नळेगावे, बालाजी वडजे, धीरज घोटाळे, योगेश आळंगे, प्रशांत आळंगे, सुजित शेळके, विजय लोमटे, विनोद मोरे, सुनिल जाधव, मुरलीधर होनाळकर, गंगाधर बलसुरे, शिवराज कमलापुरे, प्रकाश लोखंडे, राजु मुल्ला, परमेश्वर पटणे, केदार कदारे, झपु काझी, बालाजी चव्हाण, दयानंद साळुंके, अब्बास शेख आदीसह मंडळाधिकारी, तलाठी, ग्रामसेवक व शेतकरी उपस्थित होते.

## बसवराज पाटील चेअरमन यांच्या हस्ते श्री विठ्ठलसाई साखर कारखान्याचा बॉयलर प्रदिपन सोहळा संपन्न




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : मुरूम येथील श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्यागा हंगाम 2025-26 साठीया बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा कारखाना कार्यस्थळावर आज रोजी माजी मंत्री, अध्यक्ष भारतीय जनता पक्ष, लातूर जिल्हा (ग्रामीण) व आपल्या कारखान्याचे चेअरमन मा.श्री. बसवराज पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.श्री विठ्ठलसाई कारखान्याचे कामकाज मा.श्री बसवराज पाटील याच्या नियोजनबध्द मार्गदर्शनाखाली सुरू असून चालू हंगामासाठी करावयाची संपूर्ण कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.यावर्षी कारखाना कार्यक्षेत्रात लागण व खोडवा मिळून जवळपास 14000 हेक्टर उत्साची नोंद झालेली आहे. यासाठी कारखाना व्यवस्थापनाने 5 लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चीत केले आहे. यासाठी पुरेशी ऊसतोड व वाहतुक यत्रणा भरती करून त्याचे नियोजन करण्यात आले आहे कारखान्याचा मोळी पुजनाचा कार्यक्रम पुढील आठवडयात होणार आहे. या हंगामात कार्यक्षेत्रातील गाळपास आलेल्या ऊसास योग्य भाव देण्यात येणार असून कोणाचाही ऊस गाळपाविना शिल्लक राहणार नाही अशी ग्वाही कारखान्याचे चेअरमन मा.श्री. बसवराज पाटील यांनी यावेळेस दिली. याप्रसंगी मा.श्री. बापूराव पाटील, चेअरमन धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., धाराशिव, कारखान्याचे व्हा. चेअरमन मा.श्री. सादीकसाहेब काझी, उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन मा.श्री. शरण पाटील तसेच कारखान्याचे संचालक सर्वश्री शरणप्पा पत्रिके, अॅड. सुभाषराव राजोळे, अनिल सगर, रहेमान जमादार, गोविंदराव पाटील, भालचंद्र लोखंडे, शरणप्पा कबाडे, सचिन पाटील,केशवराव पवार, माणिकराव राठोड, विठ्ठलराव बदोले, संगमेश्वर घाळे, दिलीप पाटील, दत्तु भालेराव, शिवलींग माळी, अॅड. संजय बिराजदार, अॅड. विरसंगप्पा आळगे तसेच मल्लिनाथ दंडगे, प्राचार्य राम सोलंकर, प्राचार्य अशोक सपाटे, रशिद शेख, प्रा. शौकत पटेल, नाना सुर्यवंशी,योगेश राठोड, रफिक तांबोळी, मनोहर सास्तुरे, प्रल्हाद काळे, प्राचार्य उल्हास घुरघुरे, शरण पाटील व्होर्टीकर, हेमंत पाटील, कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. एस. आर. गवसाणे व सर्व अधिकारी, कर्मचारी व कामगार पत्रकार आदी मान्यवर उपस्थित होते.

## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली



**जालना** : बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी प्राचार्य डॉ.कविता प्राशर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी प्रा. स्मिता निर्मल यांनी या दोन्ही महापुरुषांच्या जीवन कार्याबद्दल माहिती दिली. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात आणि उभारणीत महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांचे योगदान महत्वपूर्ण आहे असे त्या म्हणाल्या.

सूत्रसंचालन व आभार प्रा.डॉ. प्रियदर्शन भवरे यांनी केले याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. उद्धव थोरवे, प्रा.अभिजीत ढेंबरे, प्रा. सचिन चव्हाण, प्रा.काकडे , प्रा. विलास कांबळे, श्री. विजय लोणकर, राम हिवरेकर, ज्योती धांडे, वस्तीगृह अधीक्षिका योगिता ढेंगळे यांच्यासह वस्तीगृहातील विद्यार्थीनी आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ ऑक्टोबर २०२५


## वनहक्क कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करा : कॉ. किशोर ढमाले



**कन्नड (अरुण थोरात):** आदिवासी कष्टकरी या देशाचा मुळ मालक आहे. परंतू त्यालाच आपल्या न्याय हक्कांसाठी झगडावे लागतेय हे दुर्दैव आहे. वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करुण गोर गरिब आदिवासी, कष्टकरी शेतकरी, शेतमजुरांना न्याय द्या अशी मागणी सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेचे राज्यसंघटक कॉम्रेड किशोर ढमाले यांनी केली आहे.

ते कन्नड येथे आयोजित आदिवासी जनआक्रोश मोर्चा प्रसंगी बोलत होते. यावेळी सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेच्या वतीने तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी वन हक्कांची मान्यता अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारीत नियम २०१२ व पंचायत विस्तार पेसा अधिनिय १९९६ ची योग्य रितीने अंमलबजावणी करुण हक्काचा सातबारा द्या. आदिवासींचे हक्क संपविणारे वन विधेयक २०२३ तात्काळ रद्द करा.

दि.०७ डिसेंबर २०२३ रोजी नंदूरबार ते मुंबई पायी बिढार महामोर्चास मा.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या लेखी आश्वासनांची ताबडतोब अंमलबजावणी करा. पेसा १७ संवर्ग पद भरती कला, क्रिडा, संगणक शिक्षकांना तात्काळ नियुक्त करा. क्रिमीलेयर अनुसूचित जाती जमाती च्या विरोधातला निर्णय रद्द करा. पेडकवाडी ता. कन्नड येथील मयत रावजी भावराव मेंगाळ यांचे वारस सुखराम मेंगाळ यांच्या वर वनविभागा कडून झालेल्या अन्याय अत्याचार ची चौकशी करुण संबंधिताला तात्काळ भरपाई द्या, यांसह वनहक्क दावेदारांच्या जमीन मोजणी, मालकी हक्काचा सातबारा, पिएम किसान, पिकविमा, विहिर बांधणी अनुदान, टैक्टर ल यंत्रांद्वारे शेती मशागतीस परवानगी, संपुर्ण शेतकरी कर्ज माफी, एस.टी प्रवर्गातून आरक्षणात घुसखोरी थांबवा, धुळे नंदुरबार जिल्ह्यात मेंढपाळां कडून होणारा उपद्रव थांबवा, आदी मागण्या करण्यात आल्या.

याप्रसंगी पवन सोनवणे, गौताळा ठाकर समाज संस्थेचे अध्यक्ष पांडू कडाळे, मा. पंस. सभापती खेमा मधे, सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ. रावजी पथवे, तालुकाध्यक्ष रतन मधे, परशुराम सोनवणे, बाळासाहेब बरडे, सुनील ठाकरे, गंगाराम आगीवले, सत्यशोधक सभेचे जयराम पथवे, बाळू मेंगाळ, दिनकर दाभाडे, बुधा गावंडे, शामू गांगड, कैलास पालोदकर, वच्छालाबाई वाघ, बुधाबाई पोकळे, नमाबाई भुतांबरे, सिताबाई पथवे, रेखाबाई मेंगाळ, कमळाबाई उघडे, राहीबाई वाजे, झिपा मधे, गोविंद थोरात, भावराव मधे, सुखराम मेंगाळ, राघू मेंगाळ, भावलाल जाधव, प्रल्हाद जाधव, विजय थोरात, दिपक गुंजेकर, सरिचंद राठोड, बाळू थोरात आदींसह शेकडो आदिवासी, सत्यशोधक कार्यकर्ते उपस्थित होते.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील करिअर कट्ट्याकडून पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात



**उमरगा :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र माहिती आणि तंत्रज्ञान साहित्य केंद्र यांच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात सुरू असलेल्या करिअर कट्टा या विभागाच्या वतीने बुधवार दिनांक 01 ऑक्टोबर रोजी मराठवाड्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी हात पुढे करत डिझास्टर रिलीफ फंड उभारण्यात आला.

यावेळी करियर संसदेतील विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत मदतीसाठी सर्वांना आवाहन केले.करियर संसदेच्या पुढाकाराने आयोजित या निधी संकलन मोहिमेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ पद्माकर पिटले, करिअर कट्टा समन्वयक डॉ. समाधान पसरकल्ले, डॉ. चंद्रसेन करे व करियर संसदेतील पदाधिकाऱ्यांनी, सहभाग नोंदवला.

जमा झालेला निधी थेट मराठवाड्यातील अतिवृष्टी पूरग्रस्त भागांमध्ये पाठवून तेथील लोकांना आवश्यक साहित्य पुरवण्यासाठी जमा करण्यात आला आहे.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय अस्वले यांनी मार्गदर्शन केले. "समाजाच्या संकट काळात युवकांनी मदतीचा हात पुढे केल्यास खरी सामाजिक जाणीव दृढ होते," असे ते म्हणाले.

विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव व जबाबदारीची भावना दृढ करण्यास या उपक्रमातून मदत होत आहे. या निधी संकलनासाठी करियर संसदेतील कु. अनिशा सूरवसे, प्रज्वल चव्हाण, प्रसाद ममाळे, सैफ इनामदार आणि करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला. करिअर संसदेने राबविलेल्या या उपक्रमाचे सर्वांनी कौतुक केले.



**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय केंद्राच्या संचालकपदी नियुक्ती झाल्याबद्दल डॉ.नंदकुमार सत्यनारायण राठी यांचा डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. हसन इनामदार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

## करंट्या पावसा

पिके सारी गेली
पोटाची भाकर गेली
माय माती गेली
शेती सारी गेली
तरी चैन पडला नाही
त्याच्या जीवाला
थोडीही लाज वाटली नाही
त्या बेरड पावसाला
भांड्या-कुंड्या सहित
घर संसार वाहून नेला
पोरं-सोर, गुर-ढोर
माणसंही वाहून नेली
आस होती जगण्याची
तीही वाहून नेली
करंट्या पावसाने
शेताच्या माती संगे
घराची विट मातीही नेली...

कितीदा कोपला निसर्ग
खचलो नाही कधी
नव्या उमेदीने लढत राहिलो
जिद्दीने त्याला झुकवत राहिलो
आता मात्र हरलो आहे
जगणं सारं संपलं आहे
श्वास तेवढा चालू आहे
धड मेल्यागत झालं आहे
स्वप्न पाहणाऱ्या डोळ्यांनी
आत्मविश्वास गमावला आहे
जगण्याची इच्छा आता मेली
करंट्या पावसाने
शेताच्या माती संगे
घराची वीट मातीही नेली...

**लक्ष्मण वाल्डे**
**कन्नड**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो. ८८८८६ ०६०६८**


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ ऑक्टोबर २०२५


## दुचाकी चोराला दौलताबाद पोलिसांनी केले जेरबंद




**दौलताबाद (जावेद अहेमद)** : दुचाकी चोराला दौलताबाद पोलिसांनी केले जेरबंद दि 30 रोजी दौलताबाद पोलीस निरीक्षक रेखा लोंढे पोलिस कर्मचाऱ्यां सोबत गस्तीवर असताना विना क्रमांक ची मोटर सायकल वर एक तरुण आढळून आला विचारपूस केले असता तो अट्टल मोटर सायकल चोर निघाला मनेश गोकुळ मुळे,वय.20 वर्ष, राहणार माळीवाडा, ता.जिल्हा, छत्रपती संभाजी नगर असे त्याचे नाव आहे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि 30 रोजी पोलीस निरीक्षक रेखा लोंढे, उपनिरीक्षक सुनील बोडखे,उपनिरीक्षक आयुब पठाण, पोलीस अंमलदार महेश घुगे,खुशाल पाटील, सोनवणे.हे माळीवाडा शिवारात धुळे सोलापूर महामार्ग वर गस्तीवर असताना विना क्रमांक मोटर सायकल वर जाणाऱ्या तरुणाला गाडी थांबवून विचार पूस केली असता तो उडवा उडवी चे उत्तरे देऊ लागला त्याला पोलीस स्टेशनला आणून पोलिसी खाक्या दाखवताच तो पोपटा सारखा बोलू लागला व त्याने सातारा,परिसर,छत्रपती संभाजी नगर येथील एक दुचाकी हिरो होंडा एच.एफ डीलक्स क्र एम.एच,20,एफ.सी 3195 व माळीवाडा स्वतःच्या गावातील होंडा एकटीवा क्र एम.एच,14,एफ.पी,7356,के टी एम, क्र एम.एच.20,जी.बी.4910, एच.एफ डीलक्स एम.एच, 20.एफ.एन,4254,हिरो एच.एफ, डीलक्स एम.एच.20, डी.के,2778,होंडा ऍक्टिवा एम.एच.20, पी.बी.3355 असे एकूण सहा मोटर सायकल चोरी केले असल्याची कबुली दिली त्यापैकी हिरो होंडा एच.एफ,डीलक्स क्र एम.एच, 20 एफ.सी,3195 व होंडा ऍक्टिवा क्रमांक एम.एच,20.पी.बी,3355 ह्या दुचाकी पोलिसांनी आरोपी कडून ताब्यात घेतली आहे पुढील तपास पोलीस अंमलदार खुशाल पाटील हे करत आहे






## आदिवासींचा हुंकार जन आक्रोश आरक्षण बचाव मोर्चा



**खुलताबाद ( सनिराम गावंडे)** कन्नड तालुक्यातील आदिवासी बांधव गरजला त्यावेळी बंजारा धनगर व इतर कोणत्याही समाजाचा आदिवासी एस सी समाजामध्ये अर्थात अनुसूचित जाती जमातीत समावेश केल्यास हे आदिवासी समाज कदापी सहन करणार नाही शासनाने हा निर्णय घेऊ नये असा निर्धार दिनांक 01 ऑक्टोंबर रोजी आदिवासी बांधवांनी केला.आदिवासींचा हुंकार जन आक्रोश आदिवासी आरक्षण बचाव मोर्चा हा शहरातील गिरणी ग्राउंड ते तहसील कार्यालया पर्यंत काढला व आदिवासी समाजाणे खालील मागणीचे निवेदन सादर केले1) बंजारा धनगर व इतर कोणत्याही समाजाचा अनुसूचित जमाती एसटी प्रवर्गात प्रवेश करू नये 2)वन हक्क कायद्यात सुधारणा करून आज रोजी कसत असलेल्या वन जमिनी आदिवासींच्या नावे करून सातबारा द्यावा 3)शासकीय माध्यमिक आश्रम शाळेत त्वरित शिक्षक भरती करावी 4)कन्नड येथे अनुसूचित जमातींच्या युवक युवतींसाठी ड्रायव्हिंग क्लास एम एस सी आय टी टायपिंग पोलीस व सैन्य भरती प्रशिक्षण स्पर्धा इत्यादी विनामूल्य व निवासी सुरू करण्यात यावे 5)आदिवासी घर व शासन निर्णय दिनांक १ ऑगस्ट २०२५ ची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्यात यावी वरील मागण्या त्वरित मान्य करून अनुसूचित जमाती प्रवर्गास न्याय व संरक्षण द्यावे.नुकताच मराठा आंदोलनातून हैदराबाद गॅझेटचे भूत बाहेर आल्यानंतर या गॅझेटच्या आधारे अनुसूचित जमातींचे सात टक्के आरक्षणावर डाका टाकण्याकरिता राजकीय शक्तींची हिंदू समाजात जाती-जातील तेढ पसरविण्याचे कटकारस्थान सुरू केले आहे याच कटाचा एक भाग असलेला बंजारा व धनगर समाजास अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्याकरिता बंजारा व धनगर समाजातील भोळ्या भाबड्या नागरिकांना भूलथापा देऊन सरकारवर दबाव आणण्याकरिता दिशाभूल करून भुलथापा देऊन मोर्चे काढत असून या मोर्चात गर्दी दाखवून शासनावर दबाव आणत आहेत यामागे असंतुष्ट राजकीय शक्ती आहे असे पवन राजे सोनवणे म्हणाले केवळ जाती जातीत व जाती जमातीत वाद निर्माण करून शांतता भंग करण्याचा उद्देश यामागे राजकीय शक्ती व त्यांचे बगलबच्चन च आहे प्रत्यक्षात अनुसूचित जमातींचे केवळ सात टक्के आरक्षण असून अनुसूचित जमाती प्रवर्गात एकूण ४७ जमातींचा समावेश आहे बंजारा समाजात VJNT अंतर्गत केवळ एका जातीसाठी २.५% व धनगर समाजाचा NT-D अंतर्गत २.५ टक्के आरक्षण उपलब्ध आहे त्यामुळे त्यांना अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश करण्याची कोणतीही आवश्यकता नाही असे एकलव्य संघटनेचे अध्यक्ष पवन राजे सोनवणे यांनी सांगितले आदिवासींसाठी राघोजी भांगरे राया ठाकर बिरसा मुंडा विर एकलव्य डॉ बाळासाहेब आंबेडकर अशा अनेक क्रांतीकारकांना अभिवादन करुन आदिवासींचे आरक्षण बंजारा धनगर व इतर कोणत्याही समाजाला घेता येत नाही आणी महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान तयार करून SC, ST ना दिले आहे त्याला कुलूप लावून त्याची चावी डा◌ बाबासाहेब आंबेडकरांकडे आहे तर या Sc St मध्ये कोणालाही घुसखोरी करून मिळवता येणार नाही असे गौताळा आदिवासी ठाकर समाज बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष पांडू कडाळे यांनी बंजारा धनगर व इतर समाजाला कडाडून विरोध केला.हे मोर्चे व आंदोलन हा प्रकार फक्त शासनावर दबाव आणण्याचा कट असून अनुसूचित जमाती प्रवर्गातील आरक्षणावर डाका टाकण्याचा प्रकार आहे आता कुठे तरी एसटी प्रवर्गातील युवक युवती शिक्षित व जागृत होऊन आरक्षणाचा लाभ घेण्याची स्थितीत येत आहे नेमके याच वेळी अनुसूचित जमाती प्रवर्गातील युवकांचे आरक्षणावर डाटा टाकून अनुसूचित जमाती प्रवर्गातील युवकांना शिक्षण नोकरीच्या संधीपासून दूरठेवण्याचा जातीवादी प्रवृत्तीच्या राजकीय शक्तीचा हेतू असून अनुसूचित जमाती प्रवर्गात संविधानातील तरतुदी शिवाय अनेक कोणतेही जाती समाजाचा समावेश करण्यास सकल आदिवासी समाजाचा कडाडून विरोध आहे असे एकलव्य संघटनेचे प्रदेश अध्यक्ष पवनराजे सोनवणे उपाध्यक्ष सुनील ठाकरे युवा मराठवाडा अध्यक्ष नंदू भाऊ पवार जिल्हा अध्यक्ष परशुराम सोनवणे जिल्हा अध्यक्ष सुभाष सोनवणे तालुका अध्यक्ष राजू ठाकरे ज्ञानेश्वर सोनवणे बापू तळवडे मारुती पवार राजू सोनवणे व गौताळ आदिवासी ठाकर समाज बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष पांडु कडाळे उपाध्यक्ष अल्का मेंगाळ खेमा मधे सुधाकर मेंगाळ गंगाराम आगिवले भावडू मेंगाळ कचरू सावंत राजेंद्र आगिवले सत्यशोधक शेतकरी कष्टकरी सभा चे अध्यक्ष रावजी पथवे भरत मधे बाळू मेंगाळ तुकाराम मधे आणी ठाकर भिल्ल पारधी तडवी भिल्ल या समाजाचे पुरुष व महिला हजारोच्या संख्येने उपस्थित राहून तहसीलदार विद्याचरण कडवकर यांना निवेदन दिले व त्यांनी येवून आदिवासी समाजाचे निवेदन स्वीकारून सरकार पर्यंत पोहोच करेन असे आश्वासन दिले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ ऑक्टोबर २०२५


## दौलताबाद येथे नवदुर्गा उत्सव नवरात्र निमित्ताने ५१ कर्तबगार महिलांचा सत्कार





**दौलताबाद (जावेद अहेमद)** : दौलताबाद येथे विठ्ठल रुख्मिणी मंदिरात नवरात्र उत्सव निमित्ताने दौलताबाद परिसरात वीट भट्टी कामगार, अंगणवाडी कार्यकर्त्या मदतनीस, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या पारिचारिका, आशाताई, मदतनीस, शाळेय शिक्षिका, मोलकरीण,वृद्ध महिला आदी विविध क्षेत्रात आपल्या जबाबदारी पार पडणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आलेतसेच यनिमित्ताने होम मिनिस्टर कार्यक्रम घेण्यात आले यावेळी प्रसिद्ध अभिनेते अमोल जांदे,रील स्टार आशे्लेषा रत्नपारखे, रील स्टार खंडया भाऊ, अभिषेक लोमटे, निवेदक अक्षय बोरुडे,गौरी तळकासकर यांची प्रमुख उपस्थिती होती महिलांनि विविध खेळात सहभागी होऊन आनंद लूटत उतेजनारर्थ बक्षिसे जिंकली आहे प्रथम प्रिया स्वप्नील चिनुके,द्वितीय अमृता सत्यम चिनुके,तृतीय आरती विजय परोडे चंद्रकलाबाई योगिनाथ काळे,लताबाई सुनील शेळके.अश्विनी संतोष इंगळे शारदा भाऊसाहेब सदावर्ते.या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत सदस्य किशोर जाधव यांनी केले होते यावेळी रोहित डेमने, वैशाली आनंदे, रवि बाविस्कर, अशोक वंजारे, रवींद्र वाडेकर, सत्यजित म्हस्के, गजेंद्र वाडेकर, अक्षय देशमूख, गौरव गवळी यांची प्रमुख उपस्थिती होती

## डॉ. सौ.इं.भा.पाठक महिला महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा दिन साजरा




**छत्रपती संभाजीनगर** :- येथील डॉ. सौ.इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात 03 ऑक्टोबर अभिजात मराठी भाषा निमित्ताने अभिजात मराठी भाषा:वास्तव आणि अपेक्षा या विषयावर देवगिरी महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. समिता जाधव यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते , या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई या उपस्थित होत्या,डॉ.समिता जाधव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर आता मराठी भाषिकांची जवाबदारी वाढलेली आहे, अभिजात भाषेचा दर्जा टिकविण्यासाठी व उंचावण्यासाठी मराठी ही केवळ अभिजात राहून चालणार नाही तर ती आधुनिक आणि ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान,रोजगार आणि विकासाच्या अनेक संधी देणारी भाषा कशी होईल या दृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे, असे सांगून त्यांनी भाषेचे उपयोजन वाचन, लेखन व संभाषणातून कसे प्रवाही राहते हे सोदाहरण पटवून सांगितले.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा देऊन मराठी भाषा संवर्धन आणि ती आपल्या बोलण्यातून कशी विकसित होईल या दृष्टीने प्रयत्नशील राहणे ही आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.मराठी विभाग प्रमुख डॉ मीनाक्षी देव- निमकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून मराठी भाषेची प्राचीनता, मौलिकता आणि समृद्ध वाङ्मय परंपरा या विषयी माहिती देऊन अभिजात भाषा दिना कार्यक्रमाच्या आयोजना मागिल भूमिका स्पष्ट केली. अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त महाविद्यालयाचा मराठी विभाग आणि महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ , कामगार कल्याण केंद्र,प्रियदर्शनी का◌ॅलनी, यांच्या वतीने विद्यार्थांसाठी अभिजात "मराठी भाषेचे महत्त्व", "मराठी असे आमुची मायबोली""अभिजात मराठी वास्तव आणि अपेक्षा"या विषयावर निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, या निबंध लेखन स्पर्धेतील विजेत्यांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले, त्यामध्ये प्रथम क्रमांक कु.साक्षी दत्तु गर्जे, द्वितीय क्रमांक कु.आचल साळवे तृतीय क्रमांक कु.कल्याणी लोखंडे, उत्तेजनार्थ कु. प्रिया पाथरे आणि कु.निकिता वाघयांना महाविद्यालयाच्या वतीने पुस्तक व प्रमाणपत्र देण्यात आली.

या प्रसंगी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ विभागाच्या सौ.सुवर्णा कुलकर्णी यांनी कामगारांच्या मुलांसाठी शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांविषयी माहिती दिली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अश्विनी शहाणे यांनी केले,तर आभार प्रगटन डॉ.मीनाक्षी निमकर यांनी केले, कार्यक्रमाला मराठी विभागातील डॉ.प्रेमला मुखेडकर, डॉ, प्रभाकर गायकवाड कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा.माधुरी भावसार तसेच सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या दांडिया उत्सवाचे महाविद्यालयात आयोजन



**छत्रपती संभाजीनगर** : डॉ. (सौ.) इं. भा. पाठक महिला महाविद्यालयात आज विद्यार्थी संसदेच्या वतीने सांस्कृतिक वारसा जपणारा दांडिया उत्सवाचे मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन सन्माननीय प्राचार्या सुनिता बाजपाई यांच्या हस्ते झाले.या प्रसंगी संसद प्रमुख डॉ. सुनंदा चक्रनारायण, पर्यवेक्षिका माधुरी भावसार, डॉ. रमा दुधमांडे, डॉ. उज्वला सातदिवे, प्रा. अश्वनी शहाने तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद उपस्थित होते.

हा कार्यक्रम तापडिया क्रीडा संकुल येथे पार पडला.दांडिया उत्सवाची सुरुवात मंगलमय वातावरणात महिषासुर मर्दिनी स्तोत्राने झाली. हे अमृता गायके, अर्पिता कदम, साहिल नाटेकर, दीपाली आव्हाड, वेदिका दलाल, रेश्मा पहलवान, ज्योती शिरसाठ, रश्मी राठोड यांनी सुमधुर स्वरात सादर केले. या सादरीकरणाला प्रा. शंकर विद्याते यांनी स्वरबद्ध केले होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व समिती सदस्यांनी परिश्रम घेतले.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

**Sanitary Health Inspector**

**सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर**

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ ऑक्टोबर २०२५

# आभाळ फाटलं

तोंडी आलेला घास
निसर्गाने नेला हिरावून
जीवघेणं संकट
कधी जाईल सरून

यंदा तरी पिक
जोमात येईल वाटलं
पण परतीच्या पावसानं
आभाळ सारं फाटलं

अन्न गेलं धान्य गेलं
पुरामध्ये वाहून
डोळ्यात अश्रू दाटले
उघडा संसार पाहून

शेताचं झालं तळं
नुसता नावाला सातबारा
कसा सावरू रे पावसा
दु:खाचा हा पसारा

लहरी निसर्गानं
जीवन उद्ध्वस्त केलं
असं कसं जगनं
आमच्या नशिबी आलं

- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

# राष्ट्रपिता गांधी आणि शास्त्री जयंतीनिमित्त ज्ञानेश्वर विद्यालयात आदरांजली

**बेगमपुरा (प्रतिनिधी) :** बेगमपुरा येथील ज्ञानेश्वर विद्यालयात २ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि आदराने साजरी करण्यात आली.या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे होत्या.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

मुख्याध्यापिका डॉ. मोरे यांनी आपल्या भाषणात महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा या तत्त्वज्ञानाचे आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या 'जय जवान, जय किसान' या घोषणेमागील विचारांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

दोन्ही नेत्यांचे साधे जीवन आणि उच्च विचार आजही सर्वांसाठी प्रेरणास्रोत असल्याचे त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमास विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. संभाजी तांगडे, श्रीमती आरती बिरोटे आणि श्री. प्रकाश शिंदे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन करून समारोप करण्यात आला.

१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी
शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस
DMLT कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स
PGDMLT कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर) पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)
X-RAY कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी ,१२ वी पास
C.T.SCAN कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी ,१२ वी पास
E.C.G. कालावधी १ वर्ष पात्रता : १०वी ,१२ वी पास
O.T. TECHNICIAN कालावधी २ वर्ष पात्रता : १०वी ,१२ वी पास
PG RADIOLOGY कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर) पात्रता : B.Sc. Physics
रेडिओलॉजी कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास
फिजिओथेरपी कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास
ऑप्थोमेट्री कालावधी २ वर्ष पात्रता : १२ वी सायन्स पास
9405109103 | 8830838903

# कालिकादेवी विद्यालयात, राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी



**शिरूर कासार :** दि. ०२ ऑक्टोबर २०२५ गुरुवार रोजी कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरूर (का.) जि. बीड येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५६ वी व माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची १२१ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार प्रा.महारुद्र डोंगरे,प्रा.नारायण तांबे, प्रा.विश्वास ढाकणे,व जयेंद्र निकम यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्राध्यापक महारुद्र डोंगरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की,महात्मा गांधींनी जगाला शांती, सहिष्णुता,सत्य,अहिंसा आणि स्वच्छतेचा संदेश दिला,जो संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे.त्यांनी अस्पृश्यता,निरक्षरता, व्यसनाधीनता आणि इतर सामाजिक वाईट प्रवृत्ती नष्ट करण्यासाठीच आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले. समाजातील दुर्बल घटकांना उभारी आणि आधार देण्याचे कार्य त्यांनी अविचल निश्चयाने केले.

तर भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचे विचार असे होते की,भारताने आंतरिक दृष्ट्या मजबूत होऊन देशातील गरिबी व बेरोजगारी दूर केली तर जगात आदर मिळवू शकतो.तसेच आपल्या देशाची स्वतंत्रता आणि अखंडता धोक्यात आल्यास, संपूर्ण शक्तीनिशी त्या आव्हानाचा सामना करणे हेच आपले कर्तव्य आहे.

असा निर्धार त्यांनी व्यक्त केला होता.'जय जवान,जय किसान' या त्यांच्या घोषणेतून त्यांनी सैनिकांच्या आणि शेतकऱ्यांच्या शौर्याचे स्मरण करून यामुळे देशाच्या विकासात त्यांचे योगदान मोठे होते.

यावेळी प्रा.नारायण तांबे प्रा.विश्वास ढाकणे,क्रीडा शिक्षक रवींद्र बडे,जयेंद्र निकम,सर कार्यालयीन अधीक्षक आदिनाथ काशीद,गौतम भोसले तसेच विद्यालयातील खेळाडू विद्यार्थी व विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्रीमती मंगला बिऱ्हाडे यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती शेख रेहाना उपस्थित होत्या. मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी यांच्यासह सर्व शिक्षकवृंद या प्रसंगी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ ऑक्टोबर २०२५


## माय माझी..

जल्माचं दु:ख घेऊन उरात
गेलीय ढगात माय माझी

विठूच्या सोबत उभी जिंदगाणी
पोळली रुक्मिणी माय माझी

रोजचे दुष्काळ भाळी बहात्तर
समर्थ उत्तर माय माझी

चुकले रानात एकटे हरीण
कासावीस मन माय माझी

भरल्या घराची मातीची ही चूल
सदा होरपळ माय माझी

मातीत राबून मातीतच गेली
मातीचीच झाली माय माझी

**ज्ञानेश्वर गायके**
**कन्नड**

महाराष्ट्र जनशक्ती न्यूज

# राजीव गांधी महाविद्यालय करमाडच्या वतीने ग्रामीण रुग्णालय करमाड येथे स्वच्छता अभियान




**करमाड :** राजीव गांधी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड च्या, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रामीण रुग्णालय करमाड यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण रुग्णालय करमाड येथे ‘स्वच्छता ही सेवा’ या उपक्रमांतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली होती.

ग्रामीण रुग्णालय करमाड येथे स्वच्छता मोहीम राबवून रुग्णालयातील सर्व प्लास्टिक,कचरा व अनावश्यक वस्तू उचलुन घेऊन सर्व परिसर स्वच्छ करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस.मुळे, प्रा.मनोज देवकर,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.कालिदास फड, डॉ.बाळासाहेब लिहिणार, डॉ.आश्विनकुमार चिंचोलकर, डॉ.लक्ष्मीकांत दांडगे, डॉ. इम्रान पठाण, डॉ.रमेश कचरे, डॉ.किशोर काळे, डॉ. नितीन मुळे, डॉ. सौरभ चव्हान, डॉ. अमित राऊत, डॉ. अतुल मोरे, डॉ. नानासाहेब लावंड,प्रा.प्रशांत माठे, डॉ. ललित गोल्डे, डॉ. सुखदेव पोटदुखे, प्रा.हरिदास होळकर,प्रा.तन्मय भावसार, प्रा.लक्ष्मण खरात, प्रा.रामदास घोडके, प्रा.अगंद चव्हान,प्रा.गणेश कु-हाडे,मधुकर राठोड,ज्ञानेश्वर जाधव तसेच महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# डॉ. सौ. इं.भा.पाठक महिला महाविद्यालयाला शासनाचे तीन पुरस्कार



**छत्रपती संभाजीनगर :** राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने 13 जिल्ह्यांमध्ये नैसर्गिक संसाधने व पाण्याची बचत या अभियानांतर्गत 2023 मध्ये सर्व महाविद्यालयांमध्ये ग्रीन क्लबची स्थापना करण्यात आली.

त्या माध्यमातून युवांमध्ये जनजागृती करण्यासाठी जलव्यवस्थापन, पाणीबचतीच्या विविध कृती योजना राबवल्या आल्या. 2023-24 या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील ग्रीन क्लबच्या माध्यमातून केलेल्या कामासाठी जिल्हा पातळीवरील तीन पुरस्कार डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयास प्राप्त झाले आहेत.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्या हस्ते महिला महाविद्यालयास उत्कृष्ट ग्रीन क्लब स्पर्धेमध्ये जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक पुरस्काराने सन्मानित केले.

डॉ. मीनल श्रीगिरीवार यांना जिल्हास्तरीय उत्कृष्ट ग्रीन क्लब समन्वयक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पोस्टर्स स्पर्धेमध्ये विशाखा तेडले या विद्यार्थिनीला तृतीय पुरस्कार मिळाला. तसेच रील मेकिंग स्पर्धेमध्ये भूमिका रापकर, रेणुका सावंत, श्रुती शेजवल, मंजिरी जगधने, श्रेया भोळे या विद्यार्थिनींनीच्या व्हिडिओला जिल्हास्तरीय तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

मराठवाडा लिगल ॲण्ड जनरल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा डॉ. कल्पलता भारस्वाडकर-पाटील, प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी यशस्वीतांचे अभिनंदन केले.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ ऑक्टोबर २०२५


# आपत्ती व्यवस्थापनातील सातत्य दुर्लक्षित झाल्यामुळे पूर स्थिती

महाराष्ट्र राज्याला महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (एस डी एम ए ) सारख्या संरचित संस्थात्मक यंत्रणेद्वारे मजबूत आपत्ती व्यवस्थापनाची आवश्यकता आहे, जे आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ नुसार धोरण आणि योजनांचे निरीक्षण करते परंतु हेच आपत्ती व्यवस्थापन सातत्याने दुर्लक्षित झाल्यामुळे पुर स्थिती निर्माण झाल्याचा पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव आणि जेष्ठ जल व्यवस्थापन अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले असुन राज्य शासनाने तात्काळ आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ मधील तरतुदींचा लाभ संकट ग्रस्तांना द्यावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

पुढे ते म्हणाले की,या योजनेत केंद्रीय राज्य आपत्कालीन ऑपरेशन्स सेंटर (एसईओसी) द्वारे समर्थित धोका आणि भेद्यता विश्लेषण, प्रतिबंध, शमन, तयारी, प्रतिसाद आणि पुनर्प्राप्ती प्रयत्नांचा समावेश आहे. प्रमुख प्रयत्नांमध्ये जनजागृती, प्रशिक्षण आणि स्थानिक अधिकारी, आपत्कालीन प्रतिसादकर्ते आणि समुदायांशी समन्वय यांचा समावेश आहे जेणेकरून लवचिकता निर्माण होईल आणि प्रभावी प्रतिसाद मिळेल परंतु हेच सातत्य पाळल्या गेले नाही परिणामतः निसर्गाचा कोप ओढवल्या गेला आहे.महाराष्ट्राच्या आपत्ती व्यवस्थापनाचे खरे तर प्रमुख असे स्तंभ संस्थात्मक यंत्रणा: मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षते खालील राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (एस डी एम ए) ही धोरणे आणि योजना विकसित करण्यासाठी जबाबदार असलेली केंद्रीय संस्था आहे. मुंबई स्थित राज्य आपत्कालीन ऑपरेशन्स सेंटर (एसईओसी) आपत्कालीन परिस्थितीत समन्वयासाठी तंत्रिका केंद्र म्हणून काम करते.

कायदेविषयक चौकट: राज्याच्या योजना आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अंतर्गत तयार केल्या आहेत, ज्यामध्ये २०२५ मध्ये अलिकडच्या सुधारणांसह अत्यंत हवामान विषयक घटनांच्या जोखमींचा समावेश केला गेला आहे आणि राज्य-विशिष्ट शहरी आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांना पाठिंबा देण्यात आला आहे आणि असे जर आहे तर ही स्थिती का निर्माण झाली असा ही प्रश्न त्यांनी उपस्थित केला असुन राज्य आपत्ती व्यवस्थापन योजना (एस डी एम) या योजनेत वेळोवेळी अद्ययावत केलेल्या आपत्तीपूर्व आणि आपत्तीनंतरच्या क्रिया कल्पनांचे मार्गदर्शन करण्या साठी धोका- जोखीम आणि भेद्यता विश्लेषण (हजार्ड रिस्क ॲन्ड व्हलन्याबरीटी ॲनालिसिस ) समाविष्ट आहे.पुढे ते म्हणाले की,उपलब्ध संसाधनांचा आणि कुशल मनुष्यबळाचा कार्यक्षम वापर सुनिश्चित करून प्रतिबंध, शमन, तयारी आणि प्रतिसाद यांचा समावेश करून राज्याला लवचिक बनवण्याचे उद्दिष्ट या वर भर देणे गरजेचे होते.

समन्वय आणि भागीदारी: एस डी एम ए जिल्हास्तरीय संस्था, आपत्कालीन दल, सरकारी विभाग, स्वयंसेवी संस्था आणि नागरी समाज यांच्याशी एकत्रित प्रतिसादा साठी सातत्याने समन्वय साधला गेला नसुन आपत्ती व्यवस्थापन प्रयत्नांमध्ये असुरक्षित गट आणि स्थानिक समुदायांना सहभागी करून घेण्यासाठी भागीदारी घेणे गरजेचे असतानाही असे महत्त्वपूर्ण कार्य जिल्हा स्तरावर सातत्याने का केले गेले नाही ? असाही , सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

फोकस क्षेत्रे आणि उपक्रम समुदाय सहभाग: समुदयां मध्ये जागरूकता आणि तयारीची संस्कृती निर्माण करणे गरजेचे असताना ही दुर्लक्ष का झाले आहे याचा विचार होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादनपीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव जेष्ठ जल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी करून क्षमता बांधणी वर भर देऊन प्रभावी आपत्कालीन प्रतिसादात त्यांचे ज्ञान आणि कौशल्ये वाढविण्या साठी विविध भागधारकां साठी प्रशिक्षण कार्यक्रम शासनाने सातत्याने का राबविले नाही असा सवाल देखील खुप काही दिशानिर्देश करून जात असुन प्रगत तंत्रज्ञानाचा राज्य आपत्कालीन ऑपरेशन्स सेंटर प्रगत संप्रेषण,आयसीटी पायाभूत सुविधा आणि जी आय बेस आधारित निर्णय समर्थन प्रणालीने सुसज्ज आता तरी केले जावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली असून विशिष्ट उपक्रम हाती घेण्याची गरज त्यांनी विशद केली आहे.कायदेशीर विषयावर बोलतांना पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील म्हणाले की,भारतीय संविधान,१९५० कलम १३१ आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ - राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा, २०१३ - महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५ - या सर्व कायद्यांच्या तरतुदींची अंमलबजावणी आणि पालन करण्यासाठी कायद्याअंतर्गत प्रदान केलेल्या संस्था आणि प्राधिकरणांची मोठी जबाबदारी असुन त्यासाठी आपत्ती व्यवस्थापन करतांना यथा योग्य वित्तपुरवठा करणे व त्याचे नियोजन करणे आवश्यक असुन राज्य व संसदेने लागू केलेल्या कायद्यां नुसार या कायद्याचे पालन करण्यास आणि त्यांचे पालन करण्यास नकार देऊ शकत नाही त्यामुळे कोणीही वित्त अभाव किंवा इतर काही आच्छादनाचा धूर निर्माण करू शकत नाही त्यासाठी केंद्र सरकारने कोणत्याही धोकादायक आपत्ती परिस्थिती किंवा आपत्तीचा प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीची स्थापना केली आहे असताना राज्य शासन तकलादू मदतीची आश्चर्य कारक का भुमिका निभावत आहे असाही सवाल त्यांनी उपस्थित केला असुन राज्य सरकारे. राज्य आपत्ती प्रतिसाद निधी नावाचा निधी देखील स्थापन केला आहे. शासनाची बळीराजाला नुकसान भरपाई अपुरी इच्छा दिसत असुन कायद्यातील निकष यांचा चुकीचा व जनहितार्थ नसलेला अर्थ लावत असुन नुकसान भरपाई देणारे उपाय योजले जाण्याची चिन्हे नसुन केवळ तात्काळ मदती साठी परंतु अत्यल्प व तुटपुंजे उपाय असल्याचे मत पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले असुन एकंदरीत आपत्ती व्यवस्थापन धोरण तज्ञांनी बनवले असल्याने त्यांनी सर्वच संबंधित घटकांचा विचार केला असुन धोरणाचे मुद्दे सुद्धा निश्चित असुन कोणतेही न्यायालयीन दृष्ट्या व्यवस्थापित मानक असू शकत नाहीत.

सद्य स्थितीत या सर्व कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने हाय पॉवर कमिटी स्थापना करुन निर्माण झालेल्या पूर परिस्थिती हाताळावी अशी मागणी त्यांनी राज्य शासनाला केली असुन संवैधानिक अधिकारक्षेत्राचा अविभाज्य भाग असलेल्या आपत्ती व्यवस्थापन कायद्याची अंमलबजाणी करण्याचे अती तत्काळ आदेशाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.



**राजेंद्र दाते पाटील**
मो. ९७६७४ ०१६६५






महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०४ ऑक्टोबर २०२५

# ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती आणि शेतमजूर : जगण्याच्या संघर्षाचे समाजशास्त्रीय चित्रण

महाराष्ट्र राज्याच्या कृषी क्षेत्राला पुन्हा एकदा अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि पूरजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या 'ओला दुष्काळ सदृश्य परिस्थितीने' ग्रासले आहे. निसर्गाच्या या लहरीपणामुळे पिकांचे झालेले अतोनात नुकसान केवळ जमिनीच्या मालकी असलेल्या शेतकऱ्यांसाठीच नाही, तर पूर्णपणे शेतीच्या कामावर अवलंबून असलेल्या शेतमजूर वर्गासाठी एक खोलवर जाणारे, बहुआयामी संकट घेऊन आले आहे. शेतकरी कुटुंबाप्रमाणेच, किंबहुना त्यांच्याहून अधिक, शेतमजुरांचे जीवन या संकटाने धोक्यात आणले आहे, कारण त्यांच्याकडे उपजीविकेचे दुसरे कोणतेही साधन नसते आणि त्यांची आर्थिक आधारशिला अत्यंत कमकुवत असते. या परिस्थितीकडे केवळ आर्थिक नुकसान म्हणून न पाहता, 'जगण्याच्या संघर्षाचे समाजशास्त्रीय चित्रण' म्हणून पाहणे आवश्यक आहे. ही केवळ पिकांच्या नुकसानीची गोष्ट नाही, तर सामाजिक स्तरावर उद्भवलेल्या एका खोल संकटाची, पिढ्यानपिढ्या चालणाऱ्या गरिबीच्या चक्राची आणि असुरक्षित अस्तित्वाची कहाणी आहे, जी भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या मूलभूत दोषांवर आणि सामाजिक विषमतेवर प्रकाश टाकते. शेतमजूर हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असला तरी, तो सर्वाधिक असुरक्षित, दुर्लक्षित आणि शासकीय संरक्षणापासून वंचित असलेला घटक आहे. १. उपजीविकेचा प्रश्न आणि आर्थिक असुरक्षिततेचे विषारी दुष्टचक्र :- शेतमजुरांचे अर्थकारण हे दैनंदिन मजुरीवर, श्रमशक्तीच्या विक्रीवर आणि कृषी हंगामाच्या सातत्यावर पूर्णपणे अवलंबून असते. पेरणी, निंदणी, खुरपणी, कापणी आणि मळणी यांसारख्या विविध कृषी कार्यांमधूनच त्यांची रोजीरोटी चालते. पिकांच्या प्रत्येक टप्प्यावरमिळणारी मजुरी, ही त्यांच्या कुटुंबाचे दैनिक अर्थचक्र सुरळीत ठेवणारी एकमेव चावी असते. ग्रामीण समाजरचनेत, त्यांची ओळख 'मजूर' अशीच मर्यादित राहिलेली आहे, ज्यामुळे त्यांना इतर आर्थिक संधी मिळणे कठीण होते आणि ते केवळ कृषी क्षेत्रावर अवलंबून राहतात. त्यांचे जीवन म्हणजे 'विहीर खोदा आणि पाणी प्या' या म्हणीप्रमाणेच असते, जिथे आज काम केले तरच उद्या चूल पेटेल. परंतु, ओल्या दुष्काळामुळे जेव्हा उभी पिके पाण्याखाली जातात, सडून जातात किंवा कापणीयोग्य राहत नाहीत, तेव्हा शेतीची सर्व कामे अचानक, मोठ्या प्रमाणात आणि दीर्घकाळ थांबतात. अतिवृष्टीमुळे शेतात चिखल निर्माण होतो, ज्यामुळे मजुरांना शेतीत पाऊल ठेवणेही शक्य नसते. शेतमालकांना स्वतःचे मोठे आर्थिक नुकसान झालेले असल्याने, त्यांच्याकडे मजुरांना देण्यासाठी काम आणि पुरेसा पैसा दोन्ही नसतो. परिणामी, शेतमजुरांच्या उत्पन्नाचे एकमेव आणि प्राथमिक स्त्रोत पूर्णपणे खंडित होतात. रोजंदारी थांबल्याने, त्यांच्या घरात चूल पेटवण्याचा, मुलांचे शिक्षण, आरोग्य सेवा आणि कुटुंबाचे मूलभूत पोषण सांभाळण्याचा प्रश्न अत्यंत उग्र स्वरूप धारण करतो. रोज कमावून रोज खाणाऱ्या या वर्गासाठी, एक दिवसाची मजुरी बुडणे म्हणजे कुटुंबाच्या अन्नसुरक्षेवर थेट संकट. हे संकट त्यांना अन्नसुरक्षेच्या आणि पोषणमूल्याच्या मूलभूत प्रश्नाकडे ढकलते, ज्यामुळे कुपोषण आणि आरोग्य समस्या वाढतात. विशेषतः महिला आणि लहान मुलांमध्ये पोषणविषयक समस्या गंभीर रूप धारण करतात. या आर्थिक धक्क्याची तीव्रता इतकी जबरदस्त असते की, मजुरी न मिळाल्यास त्यांना अन्नधान्य खरेदी करण्यासाठी किंवा मुलांच्या औषधपाण्यासाठी तात्काळ पैशांची गरज पडते. अशावेळी त्यांना औपचारिक बँकिंग व्यवस्थेचा आधार मिळत नाही, कारण त्यांच्याकडे तारण देण्यासाठी मालमत्ता नसते. त्यांच्याकडे केवळ त्यांची शारीरिक श्रमशक्ती हेच भांडवल असते, जे संकटकाळात निरुपयोगी ठरते. परिणामी, त्यांना गावातील सावकाराकडून, खाजगी वित्तीय संस्थांकडून किंवा उच्च व्याजदराने कर्ज देणाऱ्या बिगर-संस्थात्मक स्त्रोतांकडून कर्ज घेण्याशिवाय पर्याय उरत नाही. या कर्जाची परतफेड करण्याच्या प्रयत्नात ते अधिक खोलवर कर्जाच्या दुष्टचक्रात अडकतात. ओला दुष्काळ हे केवळ एक तात्कालिक संकट न राहता, दीर्घकालीन आर्थिक आणि सामाजिक गुलामगिरीची सुरुवात ठरते, जिथे पिढ्यानपिढ्या कर्जाचा बोजा वाहिला जातो. सामाजिक दृष्टिकोनातून पाहिल्यास, या वर्गाच्या उत्पन्नाची अनियमितता, त्यांना स्थायी आणि प्रतिष्ठित जीवन जगण्यापासून वंचित ठेवते. त्यांचे राहणीमान, घराची स्थिती (ज्याला अनेकदा सुरक्षित निवाऱ्याचा अभाव असतो), आणि सामाजिक सुरक्षितता सतत अस्थिर आणि धोक्यात असते. त्यांची क्रयशक्ती कमी झाल्याने ग्रामीण बाजारपेठेवरही नकारात्मक परिणाम होतो, ज्यामुळे संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चक्र थांबते.२. सक्तीचे स्थलांतरण आणि सामाजिक-सांस्कृतिक विघटनाचे गंभीर परिणाम :- शेतीत काम थांबल्यामुळे, उपजीविकेच्या शोधात, शेतमजुरांना त्यांच्या कुटुंबासहित सक्तीचे स्थलांतर करण्यास भाग पाडले जाते. ग्रामीण भागातून शहरांकडे, औद्योगिक केंद्रांकडे, किंवा बांधकाम क्षेत्रांमध्ये काम मिळवण्यासाठी त्यांची धावपळ सुरू होते. हे स्थलांतर तात्पुरते असले तरी, त्याचे दूरगामी सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक आणि मानसिक परिणाम होतात. कुटुंबाचे स्थलांतरण मुलांच्या शिक्षणावर अत्यंत नकारात्मक आणि अपरिवर्तनीय परिणाम करते, कारण त्यांना शाळा सोडावी लागते किंवा सतत शाळा बदलावी लागते, ज्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगती खुंटते. शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे त्यांचे भविष्य अंधकारमय होते, आणि त्यांच्या पुढील पिढीसाठीही पिढ्यानपिढ्या गरिबीचे चक्र मजबूत होते. स्थलांतरित मजुरांना शहरांमध्ये अनेकदा अमानवी परिस्थितीत जगावे लागते. त्यांना असुरक्षित, अनारोग्यकारक झोपडपट्ट्यांमध्ये किंवा बांधकाम साईटवर राहावे लागते, जिथे त्यांना स्वच्छ पाणी, शौचालय आणि सुरक्षित निवाऱ्यासारख्या मूलभूत सुविधांचा अभाव जाणवतो. त्यांना तुटपुंज्या व अनियमित कामावर गुजराण करावी लागते, जिथे त्यांना अनेकदा शोषण, भेदभावाला, जातीय भेदभावाला आणि मजुरीच्या अपहाराला तोंड द्यावे लागते. कामाच्या ठिकाणी सामाजिक आणि कायदेशीर संरक्षणाचा अभाव असतो आणि कामगार कायद्यांचे उल्लंघन सर्रास होते. गावाकडील पारंपरिक सामाजिक बंधने, आधारव्यवस्था, नात्यागोत्याचे जाळे आणि सण-उत्सवाचे सामूहिक जीवन तुटते. संकटकाळात एकमेकांना मदत करण्याची जी गावपातळीवरील व्यवस्था असते, ती स्थलांतरामुळे नष्ट होते. यामुळे स्थलांतरित झालेल्या कुटुंबांमध्ये अत्यधिक तणाव, मानसिक अस्वस्थता, एकाकीपणा आणि सामाजिक विघटनाचे वातावरण निर्माण होते. या सक्तीच्या स्थलांतरामुळे ग्रामीण समाजव्यवस्थेतील कुशल आणि अकुशल श्रमशक्तीचा तोल बिघडतो आणि गावातील आर्थिक गतिमानता मंदावते. हे स्थलांतर शेतमजुरांच्या सामाजिक प्रतिष्ठेवर आणि आत्मसन्मानावर देखील आघात करते, कारण त्यांना त्यांच्या मूळ गावातून काम सोडून जाण्याची आणि मिळेल ते काम करण्याची लाज वाटते. शहरी वातावरणात त्यांना 'परके', 'गावातून आलेले' किंवा 'कमी दर्जाचे' म्हणून पाहिले जाते, ज्यामुळे त्यांची सामाजिक एकाकीपणाची भावना वाढते आणि ते समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अधिक दूर फेकले जातात.३. स्त्रिया, बालके आणि वृद्धांवरील बहुआयामी आणि असमान संकट :- शेतमजूर वर्गातील स्त्रिया या ओल्या दुष्काळाच्या संकटाचा सामना बहुआयामी पातळीवर करतात. त्या शेतीत पुरुषांच्या बरोबरीने कष्ट करतात आणि कुटुंबाच्या उत्पन्नात महत्त्वपूर्ण भर घालतात. परंतु, काम थांबल्यावर आर्थिक संकट येताच, कौटुंबिक जबाबदारीचे, घराचे अर्थकारण सांभाळण्याचे आणि कुटुंबातील सदस्यांची काळजी घेण्याचे अतिरिक्त भावनिक, शारीरिक आणि आर्थिक ओझे त्यांच्यावर येते. झालेले नुकसान भरून काढण्यासाठी त्यांना मिळेल ते काम करावे लागते, मग ते काम शारीरिकदृष्ट्या कितीही कष्टप्रद किंवा सामाजिकदृष्ट्या असुरक्षित असो, उदा. वीटभट्टी किंवा दगड खाणीतील काम. अनेकदा त्यांना कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण, कमी मोबदला आणि अस्वच्छता यांचा सामना करावा लागतो, कारण त्यांच्यात सौदेबाजीच्या क्षमतेचा अभाव असतो.उपासमार, कुटुंबाचे आरोग्य सांभाळण्याची चिंता, कर्जाचा डोंगर आणि मुलांचे भविष्य यासारख्या अनेक समस्यांचा ताण सर्वाधिक महिलांना सहन करावा लागतो, ज्यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. या संकटामुळे कुटुंबातील महिलांच्या पोषण पातळीतही घट होते, कारण त्या अनेकदा कुटुंबाला अन्न देऊन स्वतः उपाशी राहतात, ज्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येते आणि प्रसूतीदरम्यानच्या समस्या वाढतात. दुसरीकडे, बालकांचे बालपण या परिस्थितीत पूर्णपणे हिरावले जाते आणि त्यांना 'प्रौढ' जबाबदाऱ्या लवकर स्वीकाराव्या लागतात. घरात आर्थिक टंचाई निर्माण झाल्यावर, अनेक मुलांना कुटुंबाला हातभार लावण्यासाठी बालमजुरी करावी लागते. शिक्षण कायमचे थांबते आणि ते अशिक्षिततेच्या फेऱ्यात अडकतात. लहान मुलींना कुटुंबासाठी पाणी भरणे, लहान भावंडांना सांभाळणे यांसारखी कामे करावी लागतात, ज्यामुळे त्यांचा शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकास खुंटतो.यासोबतच, कुटुंबासोबत स्थलांतर न करू शकणारे वृद्ध आणि अपंग सदस्य गावामध्ये एकटे पडतात. त्यांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी कोणीही नसल्याने त्यांना अत्यंत हलाखीचे जीवन जगावे लागते. मजुरी बंद झाल्याने त्यांना औषधोपचार आणि अन्नधान्य मिळणे कठीण होते. या वर्गासाठी सरकारने विशेष तत्काळ आधार योजना, सामाजिक सुरक्षा पेन्शन योजना आणि आरोग्य सुविधा अधिक प्रभावीपणे, त्यांच्या दारात पोहोचतील अशा पद्धतीने राबवणे आवश्यक आहे. सामाजिक सुरक्षिततेच्या जाळ्यातून हे घटक बाहेर पडल्यामुळे त्यांची असुरक्षितता अनेक पटीने वाढते.४. शासनाच्या योजनांचा अपुरा आधार, सामाजिक सुरक्षा आणि धोरणात्मक अपयश :- शासनाच्या वतीने ओला दुष्काळ जाहीर झाल्यावर अनेकदा शेतकऱ्यांसाठी मदत आणि नुकसानभरपाई दिली जाते. परंतु, ही मदत प्रामुख्याने जमीनमालक शेतकऱ्यांसाठी असते, जे पीक नुकसानीचे दाखले आणि सातबारा उताऱ्यासारखे कागदपत्रे सादर करू शकतात. शेतमजूर या संरचनेच्या परिघाबाहेर राहतात. त्यांच्याकडे जमिनीची मालकी नसल्याने ते थेट पीक नुकसानभरपाईसाठी पात्र ठरत नाहीत, आणि हीच त्यांच्या सामाजिक संरक्षणातील सर्वात मोठी आणि गंभीर त्रुटी आहे. त्यांच्यासाठी थेट आणि प्रभावी उत्पन्न आधार योजनांची आणि कामगार कल्याणाची कमतरता जाणवते.मनरेगा सारख्या योजना अनेक ठिकाणी प्रभावीपणे, नियमितपणे आणि पारदर्शकपणे राबवल्या जात नाहीत. कामाची मागणी असूनही, वेळेवर काम न मिळणे किंवा मजुरी मिळण्यास विलंब होणे, या सामान्य समस्या आहेत, ज्यामुळे मजुरांचे आर्थिक नियोजन कोलमडते. सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे (आधार कार्ड, जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला) तयार करणे आणि जटिल प्रक्रिया पूर्ण करणे अनेक निरक्षर शेतमजुरांसाठी एक मोठा आणि दुर्लक्षित अडथळा असतो. त्यांच्यासाठी विशेष नोंदणी शिबिरे, सुलभ प्रक्रिया आणि सरकारी यंत्रणेमार्फत 'प्रो-ॲक्टिव्ह' म्हणजेच सक्रिय मदत करणे आवश्यक आहे. या वर्गात संघटनशक्तीचा आणि राजकीय आवाजाचा अभाव असल्याने त्यांच्या समस्या प्रशासकीय आणि राजकीय यंत्रणेपर्यंत प्रभावीपणे पोहोचत नाहीत. यामुळे, सरकारचे कल्याणकारी धोरण कागदावर असूनही, शेवटच्या स्तरापर्यंत मदत पोहोचत नाही. हे केवळ प्रशासकीय अपयश नसून, धोरण निर्मितीतील त्रुटी आणि सामाजिक विषमतेचे लक्षण आहे. शेतमजुरांसाठी त्यांच्या उत्पन्नाची नियमितता सुनिश्चित करणारी एक स्वतंत्र आपत्कालीन मदत प्रणाली आणि श्रम-नुकसान भरपाई योजना तयार करणे ही मानवाधिकार आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून काळाची गरज आहे, ज्यामुळे नैसर्गिक आपत्ती काळात त्यांचे उत्पन्न तात्पुरते सुरक्षित राहील.५. सामाजिक न्यायाचा, मानवी प्रतिष्ठेचा आणि आत्मसन्मानाचा गंभीर प्रश्न :- ओल्या दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतमजुरांच्या 'सन्मानाने जगण्याच्या' मूलभूत मानवी हक्कावरच गदा येते. मजुरीअभावी आलेल्या उपासमारीमुळे त्यांच्यात नैराश्य, हतबलता, आणि परावलंबनाची भावना वाढते. या संकटकाळात त्यांना अन्न, पाणी आणि मूलभूत गरजांसाठी इतरांवर किंवा शासनावर अवलंबून राहावे लागते, ज्यामुळे त्यांच्या आत्मसन्मानाला आणि मानवी प्रतिष्ठेला धक्का पोहोचतो. सातत्याने मिळणाऱ्या वाईट वागणुकीमुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होतो. सामाजिक स्तरावर आधीच दुर्बळ असलेल्या या वर्गाचे संकटकाळात अधिक शोषण होण्याची भीती असते, विशेषतः कर्ज आणि कामाच्या शोधात असताना. हे शोषण केवळ आर्थिक नसून, सामाजिक आणि भावनिक स्वरूपाचेही असू शकते, ज्यामुळे त्यांचे मानसिक आणि भावनिक आरोग्य बिघडते. सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास, ज्यांच्या श्रमामुळे देशाचे कृषी क्षेत्र उभे राहते, त्यांनाच संकटकाळात आधार न मिळणे, ही एक मोठी सामाजिक विसंगती आहे. शेतमजुरांना केवळ मजुरी देणारी आणि वापरून घेणारी यंत्रणा न मानता, त्यांना समाजाचा एक अविभाज्य, सन्माननीय, हक्कदार आणि सुरक्षित नागरिक मानणे आवश्यक आहे, ज्यांना नैसर्गिक संकटापासून संरक्षण मिळवण्याचा मूलभूत अधिकार आहे. सततची आर्थिक असुरक्षितता, मुलांच्या भविष्याची चिंता, कर्जाचा वाढता बोजा, स्थलांतर आणि सामाजिक एकाकीपणा यामुळे या वर्गामध्ये मानसिक आरोग्याच्या समस्या वाढीस लागतात. नैराश्य, ताणतणाव, चिंताग्रस्तता आणि काहीवेळेस आत्महत्येचे विचार यांसारख्या समस्यांकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते, कारण ग्रामीण भागात मानसिक आरोग्याविषयी जागरूकता आणि सुविधांचा अभाव आहे. त्यांच्या या मानसिक आरोग्याच्या संकटाचा सामना करण्यासाठी समुपदेशन आणि मानसिक आरोग्य सेवा पुरवणे देखील महत्त्वाचे आहे. त्यांना केवळ आर्थिक मदत नव्हे, तर भावनिक आधार देण्याची गरज आहे.समारोप: परिवर्तनाची आवश्यकता, समाजशास्त्रीय कर्तव्य आणि धोरणात्मक क्रांती :- ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती ही महाराष्ट्रातील शेतमजुरांसाठी केवळ एक नैसर्गिक आपत्ती नाही, तर त्यांच्या जगण्याच्या आणि अस्तित्वाच्या संघर्षाची पुनरावृत्ती आहे. या संकटाचे मूळ केवळ नैसर्गिक नसून, ते सामाजिक, आर्थिक आणि धोरणात्मक विषमतेच्या खोलवर रुजलेल्या संरचनेत दडलेले आहे. शेतमजुरांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी केवळ तात्पुरती मजुरी पुरवणे किंवा 'सहानुभूती' दर्शवणे पुरेसे नाही, तर त्यांच्या सामाजिक संरचनेत आणि धोरणात्मक चौकटीत मूलभूत आणि क्रांतिकारी बदल करणे आवश्यक आहे. यासाठी दीर्घकालीन, रचनात्मक आणि धोरणात्मक उपाययोजनांची गरज आहे: त्यामध्ये १. त्यांच्यासाठी शेतीच्या कामाव्यतिरिक्त शाश्वत आणि पूरक उपजीविकेचे स्रोत निर्माण करणे, उदा. कृषी आधारित लघुउद्योग, प्रक्रिया उद्योग किंवा कौशल्य विकास प्रशिक्षण. २. त्यांना व्यापक सामाजिक सुरक्षा कवच (उदा. आरोग्य विमा, पेन्शन, विमा योजना, मोफत शिक्षण) पुरवणे आणि या योजनांचा लाभ घेण्यासाठीची प्रक्रिया अत्यंत सुलभ करणे. ३. नैसर्गिक आपत्त्यांसाठी केवळ शेतकऱ्यांसाठीच नव्हे, तर शेतमजुरांनाही थेट आणि त्वरित लाभ देणारी स्वतंत्र आणि त्वरित वितरित होणारी आर्थिक आधार योजना तयार करणे, ज्यामध्ये मजुरीचे नुकसान भरून काढण्याची तरतूद असेल. ४. मनरेगासारख्या योजनांची अधिक प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी सुनिश्चित करणे आणि त्यांना शहरी क्षेत्रातील कामांशी व इतर उद्योगांशी जोडणे. ५. शेतमजुरांच्या कल्याणासाठी स्वतंत्र कृषी कामगार आयोग स्थापन करणे आणि त्यांच्यासाठी किमान वेतन व कामाच्या सुरक्षिततेचे कायदे अधिक कठोरपणे लागू करणे.प्रस्तुत लेख 'ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती'मुळे शेतमजुरांच्या जीवनात निर्माण झालेल्या गंभीर सामाजिक, आर्थिक, भावनिक आणि मानवी परिणामांचे सखोल चित्रण करतो. या वंचित वर्गाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांच्या श्रमाचे योग्य मोल देण्यासाठी आणि त्यांच्या सन्मानाचे जीवन सुनिश्चित करण्यासाठी शासकीय धोरणांमध्ये, सामाजिक दृष्टिकोनात आणि प्रशासकीय यंत्रणेत मूलभूत बदल करणे आज काळाची अत्यावश्यक आणि नैतिक गरज आहे. त्यांच्या संघर्षाला समाजाची आणि व्यवस्थेची खंबीर साथ मिळाली तरच, त्यांचा जगण्याचा संघर्ष कमी होईल आणि ते सन्मानाचे, सुरक्षित आणि न्यायपूर्ण जीवन जगू शकतील.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**
ईमेल —
bagate.rajendra5@gmail.com